सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एमआयएस-०४२१/ प्र.क्र.११३/ विशा- ४, दि. ०८/०६/२०२६.

**विषय** :- मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर ५०० मनुष्यबळाच्या सेवा बाह्ययंत्रणेकडून (महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून) घेण्यास मंजुरी देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एमआयएस-०४२१/ प्र.क्र.११३/ विशा- ४, दि. ०८/०६/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०६०८१५३३२८०४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 11-06-2026 17:56:31

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई / मिरा-भाईंदर-वसई-विरार वगळून)
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
कार्यासन अधिकारी, का क्र.२६-ब

प्रत,
विशेष पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (पुनर्रचना).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर ५०० मनुष्यबळाच्या सेवा बाह्ययंत्रणेकडून ( महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून) घेण्यास मंजुरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०४२१/प्र.क्र.११३/विशा-४**
मंत्रालय मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: ०८ जून, २०२६

वाचा-:
१. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०४२१/प्र.क्र.११३/विशा-४,दि.०६ जून,२०२४.
२. अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे दि.२० फेब्रुवारी, २०२५ रोजीचे पत्र.
३. उप समितीच्या दिनांक १४ मे,२०२६ रोजीच्या सहाव्या बैठकीचे कार्यवृत्त वित्त विभाग पत्र क्र.पदनि-२०२६/प्र.क्र.३२/आपुक दि.२७.०५.२०२६.

प्रस्तावना-:

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पालघर घटकाचे विभाजन करून मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय हे दि.०१.१०.२०२० पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस शिपाई पदे विहित मार्गाने भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत किमान ११ महिने कालावधीसाठी एकूण ५०० मनुष्यबळ महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाकडून घेण्याची विनंती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केली होती. सदर विनंतीस अनुसरून मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत पोलीस शिपाई पदे विहीत मार्गाने भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यत किमान ११ महिन्यांच्या कालावधीकरीता एकूण ५०० मनुष्यबळाच्या सेवा महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाकडून घेण्याकरीता मुदतवाढ देण्यास वित्त विभागाने गठीत केलेल्या उपसमितीच्या शिफारसीस अनुसरून मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय -:**

०१. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पालघर घटकाचे विभाजन करून नव्याने निर्माण केलेल्या मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत पोलीस शिपाई पदे विहीत मार्गाने

भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यत एकूण ५०० मनुष्यबळाच्या सेवा महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाकडून घेण्याकरीता दिनांक ०१.०३.२०२५ ते ३१.१२.२०२६ या कालावधीपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौ.संदर्भ क्र.११२/आपुक २५, दि.२१.०४.२०२५ व वित्त विभागाने गठित केलेल्या उपसमितीच्या दि.१४.०५.२०२६ रोजीच्या शिफारसीस अनुसरून देण्यात येत आहे. तसेच यापुढे सदर मनुष्यबळाच्या सेवांना मुदतवाढ देण्यात येणार नाही.

०३. या बाबीकरीता येणारा खर्च हा लेखाशिर्ष बी-१, २०५५-पोलीस या मुख्य लेखाशिर्षातर्गत १०९ (००) (०१) २०५५ ०१६८ जिल्हा पोलीस बल या उपलेखाशिर्षाखाली १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षातून चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून खर्च करण्यात यावा. याकरिता पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांना नियंत्रण अधिकारी तसेच त्यांच्या अधिनस्त वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६०८१५३३२८०४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA MOTIRAM HOLKAR

Digitally signed by RAJENDRA MOTIRAM HOLKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=ac1bf43d6978ca6d925e9240f8c09bf2f3128ad5d62a0dd7d57d2b72c9ea41f4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=48F41D082A9DD86B54CCCF5B4C6A83A6132C3F6F06A9940BD960612800458BA7, cn=RAJENDRA MOTIRAM HOLKAR
Date: 2026.06.08 15:34:14 +05'30'

**(राजेंद्र होळकर)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
३) पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालय
४) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,मुंबई
५) सर्व पोलीस आयुक्त
६) सर्व पोलीस अधीक्षक
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
९) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
१०) अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई
११) वित्त विभाग कार्यासन (व्यय-७),वित्तिय सुधारणा ,(आपुक) मंत्रालय,मुंबई
१२) गृह विभाग, कार्यासन,पोल-५,पोल-३, अर्थ-१ मंत्रालय,मुंबई
१३) निवडनस्ती विशा-४